सांगितले. यावेळी सर्व आस्थापनांच्या समितीचा आढावा घेण्यात आला.

गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ८५ वा ● शुक्रवार ११ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/–

| * Volume 1 | Issue 85 | Date : 11/08/2023 | blow : Firyday | Page 4 | Price 4

# विरोधकांच्या अविश्वास प्रस्तावात मोदी सरकार पास



मुंबई : विरोधकांनी संसदेत आणलेला अविश्वास प्रस्ताव मोदी सरकारने जिंकला. विरोधकांनी सभात्याग केल्यामुळे हा प्रस्ताव आवाजी मतदानाने फेटाळण्यात आला.

गेल्या तीन दिवसांपासून लोकसभेत अविश्वास प्रस्तावावर चर्चा सुरू आहे. पण मतदानाच्या आधी, मोदींच्या मणिपूरच्या भाषणाच्या आधीच विरोधकांनी सभात्याग केला. नंतर आवाजी मतदानाने मतदान घेण्यात आलं असून त्यामध्ये अपेक्षेप्रमाणे मोदी सरकारचा विजय झाला आहे. आज मतदानाच्या आधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषण करताना विरोधकांवर सडकून टीका केली. विरोधकांचा अविश्वास प्रस्ताव हा भाजपसाठी शुभ संकेत असतो, त्यामुळे येत्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भाजप विक्रमी जागा मिळवून सत्तेत येणार असा विश्वासही नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. मणिपूरमध्ये आज जी काही समस्या आहे ती काँग्रेसच्या काळात निर्माण झाल्याची टीका पंतप्रधानांनी केली. विरोधक मणिपूरच्या मुद्द्यावरून राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. ईशान्य भारत आमच्या काळजाचा तुकडा असून त्याचा विकास करणे हेच ध्येय असल्याचंही पंतप्रधानांनी सांगितलं काँग्रेसने ईशान्य भारताकडे नेहमीच दुर्लक्ष केलं असून आमच्यामुळे पहिल्यांदाच ईशान्य भारताचा विकास होत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## मणिपूरमध्ये लवकरच शांतीचा सूर्य उगवेल, नरेंद्र मोदींचा विश्वास


नरेन्द्र मोदी, प्रधानमंत्री

नवी दिल्ली : मणिपूरमध्ये जे काही चाललं आहे ते दुर्दैवी असून दोषींना कडक शिक्षा देण्यात येईल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत सांगितलं. मणिपूरमध्ये लवकरच शांतीचा सूर्य उगवेल, मणिपूरच्या मागे देश ठाम उभा आहे असंही ते म्हणाले. मणिपूरची आजची स्थिती ही काँग्रेसच्या काळात निर्माण झाल्याचा आरोपही मोदींनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मणिपूरवरील निवेदनाआधीच विरोधकांनी सभात्याग केला होता.

मणिपूरच्या मुद्द्यावरून विरोधकांनी मोदी सरकारवर अविश्वास प्रस्ताव आणला होता. त्यावर बोलताना नरेंद्र मोदी यांनी मणिपूरची घटना दुर्दैवी असल्याचं सांगितलं. त्याचसोबत संसदेत भारतमातेबद्दल जे काही वक्तव्य करण्यात आलं तेही दुर्दैवी असल्याचं सांगत त्यांनी काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर टीका केली.

मणिपूरमध्ये महिलांसोबत जे काही झालं ते चुकीचं झालं असून दोषींना कडक शिक्षा देणार असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. ते म्हणाले की, मणिपूरवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सविस्तर माहिती दिली, मणिपूरवर चर्चा करण्याचा प्रस्ताव दिला. आता मी मणिपूरवासियांना सांगतोय की, देश तुमच्या मागे आहे. लवकरच त्या ठिकाणी शांतता नांदेल.

मणिपूर मुद्द्यावरून काँग्रेस आणि विरोधकांवर टीका करताना नरेंद्र मोदी म्हणाले की, सत्तेत नसेल तर विरोधकांची काय अवस्था होते ते दिसतंय. काही जण भारतमातेच्या मृत्यूचं वक्तव्य करतात. हे ज्यांच्या मनात आहे तेच त्यांच्या कृतीत येत. हे तेच लोक आहे ज्यांनी भारताचे तुकडे केले. वंदे मातरम गीताचेही त्यांनी तुकडे केले. अकाल तख्तवर हल्ला करणारे आज आम्हाला प्रश्न विचारतात. विरोधकांना मणिपूरच्या मुद्द्यावरून राजकारण करायचं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ईशान्य भारतातील जनतेचा काँग्रेसने विश्वासघात केला. काँग्रेसने १९६६ साली । पान २ वर

## इंदू मिल येथील बाबासाहेबांचा पुतळा

## डॉ.आंबेडकरांच्या ३५० फूट उंचीच्या पुतळ्यास मान्यता



मुंबई : दादर येथील इंदू मिलच्या जागेवरील आंतरराष्ट्रीय स्मारकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ३५० फूट उंचीचा पुतळा उभारण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. विख्यात शिल्पकार राम सुतार यांनी त्यांच्या गाझियाबाद येथील शिल्पशाळेत डॉ. आंबेडकर यांच्या २५ फूट उंचीच्या पुतळ्याची प्रतिकृती तयार केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत १६ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवारातील सदस्य, लोकप्रतिनिधी तसेच आंबेडकरी चळवळीतील मान्यवर व्यक्ती यांना सोबत घेऊन गझियाबाद येथील शिल्पशाळेतील आंबेडकरांच्या पुतळ्याची प्रतिकृती प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्याचे ठरले होते. त्यानुसार ६ एप्रिल रोजी प्रतिकृतीची पाहणी करून, त्यास संमती देण्यात आली. राज्य शासनाने आता गझियाबाद शिल्पशाळेतील २५ फुटी प्रतिकृतीच्या धर्तीवर इंदू मिलच्या जागेवरील स्मारकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ३५० फूट उंचीचा पुतळा बसविण्यास मान्यता दिली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने गुरुवारी त्यासंबंधीचा शासन आदेश काढला आहे.

## मणिपूर हिंसाचाराच्या चौकशीबाबत सर्वोच्च न्यायालयाचा लेखी आदेश, पोलीस अधिकाऱ्यांचीही भूमिका तपासणार



मणिपूर : मणिपूर हिंसाचाराच्या चौकशीबाबत सर्वोच्च न्यायालयाचा लेखी आदेश देण्यात आले आहे. ७ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयच्या तपासावर लक्ष ठेवण्यासाठी पोलिस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी जारी करण्यात आलेल्या लेखी आदेशात म्हटले आहे की, पडसलगीकर सीबीआय आणि एसआयटीच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याबरोबरच मणिपूर हिंसाचाराप्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांचीही भूमिका तपासणार आहे. दोन महिन्यांत सर्वोच्च न्यायालयात अहवाल सादर करणार आहेत.

मणिपूर हिंसाचार पीडितांच्या मानवतावादी पैलूंवर देखरेख करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय तीन माजी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे. आता जारी केलेल्या लेखी आदेशात या समितीला दोन महिन्यांत आपला अहवाल न्यायालयात सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. जम्मू काश्मीरच्यामजी मुख्य न्यायाधीश गीता मित्तल ( यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये शालिनी जोशी (माजी बॉम्बे कऊ न्यायाधीश) आणि आशा मेनन (माजी दिल्ली कऊ न्यायाधीश) यांचा समावेश आहे. ही समिती लवकरच मणिपूरचा दौरा करणार आहे. त्यांना आवश्यक सुरक्षा पुरवावी, असे न्यायालयाने राज्य सरकारला आदेश दिले आहेत.

यापूर्वी सीबीआयकडे सोपवण्यात आलेल्या ११ प्रकरणांमध्ये २ महिलांची धिंड । पान २ वर

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक प्रवेशावेळी शिक्षण, परीक्षा शुल्काची रक्कम घेऊ नये : सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले

**✻ मागासवर्गीय विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थेची राहील ✻ सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या महाविद्यालयावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल**


सोलापूर/प्रतिनिधी : सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून जिल्ह्यातील कनिष्ठ/वरिष्ठ/ व्यावसायिक/तांत्रिक/वैदकिय/ बिगर व्यावसायिक महाविद्यालयांनी कोणत्याही मागासवर्गीय विद्यार्थ्याकडून शैक्षणिक प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम घेऊ नये, असे समाज कल्याणचे सहायक आयुक्त नागनाथ चौगुले यांनी कळवले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या वतीने समाजकल्याण कार्यालयामार्फत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी, राजर्षी छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व विद्या वेतन या योजनांचा लाभ देण्यात येतो. या सर्व योजना शासनामार्फत चरहरवलींरहरळीं.सीं.ळप या प्रणालीवरुन ऑनलाईन राबविण्यात येत आहेत.

सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून नवीन/ नूतनीकरणाचे प्रवेश करतेवेळी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात येणाऱ्या केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेच्या (उ–झ) माध्यमातून प्रवेश प्राप्त होणाऱ्या उमेदवारांना त्याच्या संवर्गाप्रमाणे शासन स्तरावरुन । पान २ वर

## मध केंद्र योजनेसाठी अर्ज करावेत जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग महामंडळामार्फत मध केंद्र योजनेसाठी ११ सप्टेंबर २०२३ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडे यांनी केले आहे.मध उद्योगांना मोफत प्रशिक्षण, साहित्य स्वरूपात ५० टक्के अनुदान व ५० टक्के स्वगुंतवणूक, शासनाच्या हमीभावाने मध खरेदी, विशेष छंद प्रशिक्षणाचे सुविधा, मधमाशा संरक्षण व संवर्धनाची जनजागृती अशी या योजनेचे वैशिष्ट्ये आहेत. वैयक्तिक मधपाळ योजनेसाठीअर्जदार साक्षर असावा. स्वतःची शेती असल्यास प्राधान्य राहील. वय १८ पेक्षा जास्त असावे. केंद्र चालक प्रगतशील मधपाळ योजनेसाठी अर्जदार दहावी पास असावा वय वर्ष २१ पेक्षा जास्त असावे . व्यक्तींच्या नावे अथवा त्या व्यक्तींच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तींच्या नावे किमान एक एकर शेत जमीन किंवा भाडे तत्त्वावर घेतलेली शेतजमीन असावी. तसेच लाभार्थीकडे मधमाशापालन प्रजनन व मध उत्पादनात बाबतीत लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असावी. केंद्र चालक संस्थेसाठी संस्था नोंदणीकृत असावी. संस्थेच्या मालकीची किंवा दहा वर्षासाठी भाडे तत्त्वावर घेतलेली किमान एक एकर शेत जमीन तसेच संस्थेच्या नावे किमान एक हजार चौरस फूट सुयोग्य इमारत असावी. मधमाशापालन प्रजनन व मध उत्पादनात बाबतीत लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असावी.धिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी कार्यालय,(दूरध्वनी क्र.०२१७–२६००१२८) सोलापूर यांच्याशी संपर्क साधावा असे अवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बनसोडे यांनी केली आहे.

## मारुती व्हॅनच्या अपघातात चार ठार, सहा जण जखमी; देवदर्शनासाठी निघालेल्या भक्तांवर काळाचा घाला



सांगली : सांगली जिल्ह्यातील लोकरेवाडीला देवदर्शनासाठी भक्तांना घेऊन निघालेली मारुती ओमनी व्हॅन सूर्याचीवाडी (ता. खटाव) येथे रस्त्याकडेच्या झाडावर आदळून झालेल्या भीषण अपघातात चारजण ठार तर, सहाजण जखमी झालेत. हा अपघात गुरुवारी पहाटे सहाच्या सुमारास झाला. अपघातात पांडुरंग सिद्धराम देशमुख (५५, रा. सिद्धेश्वर कुरोली), मालन धनाजी राऊत (५५, रा. बनपुरी, ता. खटाव) आणि सुरेखा बबन शिंदे (६०, मुळगाव राणंद सध्या रा. दहिवडी, ता. माण) यांचा जागीच मृत्यू झाला. तर, सुवर्णा संजय शिंदे (४५, रा. बनपुरी) यांचा वडूज ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेत असताना मृत्यू झाला.

बाळकाबाई तुकाराम देवकर (६०, रा. बनपुरी), कोमल तेजेंद्र जाधव (२८, रा. निसराळे), अमोल श्रीरंग बनसोडे (३०, रा. सिद्धेश्वर कुरोली), सुनंदा श्रीरंग बनसोडे (५०), कुंदा काशिनाथ देशमुख (५५) आणि अन्विक निलेश देशमुख (६ चौघेही रा. सिद्धेश्वर कुरोली) हे सहाजण जखमी झाले आहेत. खटाव तालुक्यातील । पान २ वर

## सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती बंधनकारक : राज्य महिला आयोग सदस्या आभा पांडे

नागपूर/प्रतिनिधी३ दैनंदिन जीवनात महिलावरील लैगिक अत्याचाराच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे आढळून आले आहे. यावर प्रभावीपणे प्रतिबंध लावण्यासाठी शासकीय व अशासकीय आस्थापनांमध्ये अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती आवश्यक असल्याचे शासनाचे निर्देश आहेत. जिल्ह्यातील सर्व आस्थापनांमध्ये ही समिती लवकरात लवकर गठीत करावी. अन्यथा कार्यालय प्रमुखावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार असल्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्या आभा पांडे यांनी दिल्या आहेत.




कामाच्या ठिकाणी महिलांचा छळ अधिनियम २०१३ संदर्भात आढावा बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. अपर जिल्हाधिकारी आशा पठाण, महिला व बाल विकास विभागाच्या विभागीय उपायुक्त डॉ. अपर्णा कोल्हे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी भारती मानकर तसेच सर्व विभागाचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारा लैगिंक छळ यावर प्रतिबंध करण्यासाठी अंतर्गत तक्रार समितीची स्थापन करण्यामागील उद्देश आहे. ज्या कार्यालय प्रमुखांनी अजूनपर्यंत समिती गठीत केली नाही त्यांनी ती गठीत करावी. अन्यथा दंडात्मक कार्यवाही म्हणून ५० हजार रुपये दंड वसूल करण्यात येईल, असे आभा पांडे यांनी सांगितले.

अप्पर जिल्हाधिकारी आशा पठाण यांनी जिल्ह्यातील समिती गठीत झालेल्या आस्थापना व समिती न गठीत झालेल्या आस्थापना यांची क्रमवार यादी करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. १९ जून २०१४ च्या शासन निर्णयाप्रमाणे समितीमध्ये वरिष्ठ महिला अधिकारी समितीच्या अध्यक्ष राहतील. तसेच कायद्याचे ज्ञान व सामाजिक कार्य असलेले दोन कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व अशासकीय सदस्य अशी समितीची रचना राहील. समितीत ५० टक्के महिला असणे आवश्यक आहे. कार्यालय प्रमुख नोडल अधिकारी राहणार आहे. प्रत्येक आस्थापनांनी समितीचा । पान २ वर

## ❋ सुविचार ❋

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### विकासापासून वंचित..

महाराष्ट्र-तेलंगणा सीमावादाचा मुद्दा गंभीर असतानाच गुजरात सीमा भागातील काही मराठी गावांमध्ये घुसखोरी करून अतिक्रमण केल्याचे दिसून आले आहे. याप्रकरणी विधिमंडळात विरोधी पक्षाच्या आमदारांनी हा मुद्दा उपस्थित केला तेव्हा महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी हा मोठा प्रश्न नाही. गावकऱ्यांची कुठलीही तक्रार नाही, असे सांगत गुजरात-महाराष्ट्र सीमावादाच्या नव्याने सुरू झालेल्या प्रश्नाला गंभीरपणे घेतले नाही. वादाला आताच तोंड फुटल्याने तो वरवर गंभीर वाटत नसला तरी येत्या काही वर्षांत हा वाद महाराष्ट्र- कर्नाटक सीमावादाप्रमाणे गंभीर होऊ नये, यासाठी सरकारने आताच योग्य ती पावले उचलण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातील वेवजी व झाई येथील जमिनीवर गुजरात सरकारने अतिक्रमण केले आहे. स्थानिक नागरिकांनी हा मुद्दा लक्षात आणून दिला तरी सरकारने कुठलीही ठोस कारवाई केली नाही. वेवजी गावातील जमिनीवर गुजरातच्या सोलसुंभा ग्रामपंचायतीने अतिक्रमण केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या भागाची पाहणी केली तेव्हा गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी व ग्रामस्थांनी आपली बाजू मांडली होती. महाराष्ट्र-कर्नाटक आणि महाराष्ट्र-तेलंगणा सीमावादावर तोडगा न निघाल्याचे दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. तेथील सीमा भागातील गावांच्या विकासकामांकडेही राज्य सरकार गंभीरपणे लक्ष देत नाही. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष तेथील सीमा भागातील अनेक गावांना भेडसावत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील काही गावांनी तर महाराष्ट्राबाहेर जाण्याचीही तयारी केल्याचे आता दिसू लागले आहे. त्याचीच पुनरावृत्ती पालघर जिल्ह्यात होऊ न देण्यासाठी तत्काळ उपाय होणे गरजेचे आहे. पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन नऊ वर्षे लोटली असतानाशिक्षण, आरोग्य, रोजगार, पाणी, रस्ते, वीज यासारख्या मूलभूत सुविधांपासून सीमा भागातील गावे वंचित आहेत. सीमा भागात आदिवासी समाजाची लोकसंख्या सर्वाधिक आहे. रस्ते, पाणी, वीज, रोजगार, शिक्षणापासून हा भाग अद्यापही वंचितच आहे. उपचारासाठी सीमा भागातील गावकरी गुजरात राज्याच्या वापी, बलसाड, सिल्व्हासा या शहरात जातात. तेथील परिसरात रोजगार उपलब्ध असल्याने अनेक गावे रोजगारासाठी त्यावरच अवलंबून आहेत. पालघर जिल्ह्यासह सीमा भाग विकासापासून वंचित राहिला आहे.

# माणसिक गुलाम मालकाला सलाम..

देशामध्ये माणसिक गुलामांची संख्या एवढी वाढलेली आहे की लोकांचे बोलणे, कृत्य याचा विचार केला तर त्यांच्या बुद्धीची किव येते. माणसिक गुलामी किती घातक असते याचे ज्वलंत उदाहरणे आपण हल्ली पाहतो आहे. माणसिक गुलाम कधीच स्वतः चा मेंदु, तर्क, वापरत नाही. मालकाने सांगितले त्यावरच अंमल करून आपण मालका प्रती किती एकनिष्ठ आहोत हे दाखवण्यासाठी तो तत्पर असतो. राजकीय पोळी भाजुन लोकशाही व संविधानाचा गैरवापर करणाऱ्या लोकांना देशात जागृत नागरिक नाही तर गुलाम नागरिक हवे आहेत. ज्याच्या आधारावर जनविकास व राष्ट्रहीत या मुद्द्यावर कोणी चर्चा करणार नाही व देशाची सत्ता हाती ठेवून देशाची लुट करायला सोपे जाईल. माणसिक गुलामांच्या जोरावरच देशात जातीय व धार्मिक दंगली घडवून आणल्या जातात त्याचाच परिणाम विषमता, द्वेष कायम राहुन माणुस माणसापासून दुर जाऊन धार्मिक कट्टरता निर्माण होते. धर्म धोक्यात आहे असे सांगुन माणसिक गुलामाचा वापर राजकीय हित जोपासण्यासाठी केला जातो. धर्माच्या व धर्मसंसक्षणाच्या नावावर जातीय दंगली घडून ज्या धर्म रक्षकांवर गुन्हे दाखल होतात त्यांच्या जमानती घेण्यासाठी एकही नेता, धार्मिक संघटना समोर येऊन पुढाकार घेत नाही. कारण लढणारे गुलाम आहेत हे त्यांना माहिती आहे. गुलामांना मदत जरी केली नाही तरीही ते मालकाशी एकनिष्ठ च राहतात याची जाणीव सत्तेची पोळी भाजणाऱ्या व धर्माला ढाल बनवून करोडो लोकांच्या जिवाशी खेळणाऱ्या लोकांना चांगले माहिती आहे. धर्माच्या नावाखाली माणसिक गुलाम बनलेले स्वतः च्या मेंदुचा वापर न करणारे काही गुलाम समुह स्वतः ला थोडा फार वैचारिक व अभ्यासु दाखवण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याचे विचार व बोलणे याला काहीच अर्थ, तर्क व आधार नसतो. मुळ विषयांवर बोलण्याची हिंमत होत नाही. केवळ द्वेष आणि विषमता प्रस्थापित होईल असे बोलणे याला वैचारिकता म्हणत नाहीत. फुले शाहु आंबेडकर यांचे खरचं खुप मोठे उपकार आपल्या देशावर आहेत. जर त्यांच्या विचाराने आपण वागलो तर देश एका दिवसात महासत्ता होईल. हि अतिशोक्ती नाही तर वास्तविक आहे. परंतु गुलामांनी फुले शाहु आंबेडकर यांना च जातीत बांधुन स्वतः च्या अकलेची क्षमता दाखवून दिली. जेथे फुले शाहू आंबेडकर असतात तेथे माणसिक गुलामी नसते, द्वेष विषमता नसते. आणि धार्मिक व जातीय दंगली तर सोडुनच द्या. म्हणून हि व्यवस्था फुले शाहु आंबेडकर यांचे खरे विचार देशातील नागरिकांच्या मनात रुजुच देत नाही. म्हणून गुलामांची संख्या वाढत आहे. गुलामांची संख्या वाढत असल्याने देशात शिक्षण, आरोग्य, रोजगार, शिक्षण व महागाई यावर चर्चा होतच नाही. महत्वाचे विषय बाजूला सारून शुल्लक विषयावर वातावरण गरम करून मुळ मुद्यावरुन लक्ष विचलित करून देशाची लुट सुरू आहे. गुलामांना नेमकी चर्चा कशावर करावी याचेही भान नसते. दोन महिन्यापेक्षा जास्त काळ होऊनही मनीपुर सतत जळत आहे त्यावर मानसिक गुलाम व त्यांचे मालक एकही शब्द बोलायला तयार नाहीत. बेरोजगारी, महागाई वाढून जनता आर्थिक बाजुने होरपळत आहे त्यावर कोणी बोलत नाही. स्वतः ला राष्ट्रभक्त समजणारे लोक देशाचा राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, नाकारणाऱ्या व गांधी यांच्या वडीलांवर संशय घेणाऱ्या, महात्मा फुलेंबद्दल चुकीचे विधान करणाऱ्या मनोहर कुलकर्णी च्या बाजुने उभे राहतात तेव्हा मात्र यांची गुलामी किती खोलवर गेली याची प्रचिती येते. मनीपुर चा साधा निषेधही न करणारे गुलाम मनोहर कुळकर्णी साठी रस्त्यावर येऊन आंदोलन करत आहेत. माणसिक गुलामांना आपला व देशाचा शत्रु कोण? कोणाचा विरोध कशासाठी व का करायचा याचे काहीच भान नसते. कारण मालकाने सांगितले तरच हे उड्या मारतात नाहीतर शांत बसतात. एखादा व्यक्ती बरोबर आहे की चुक आहे हे गुलाम कधीच ठरवत नसतात. ते केवळ मालकाच्या इशाऱ्यावर नाचतात. मालकही वेळोवेळी गुलामांचा वापर करून घेण्यासाठी कोणतेही परंतु कोणताच फायदा नसणारे विषय उकरून काढून त्यावर गोंधळ निर्माण करत असतात जसे बऱ्याच दिवसापासून औरंगाबाद हा विषय जाणीव पुर्वक उचलून धरला जात आहे. त्यातून साध्य काहीच होणार नाही. परंतु वातावरण दुषीत केले जात आहे. औरंगजेब हा छत्रपती शिवरायांचा राजकीय शत्रु होता. ठिक आहे राजकीय शत्रु होता म्हणून आपण औरंगजेब याला शत्रु मानले. परंतु औरंगजेब राजकीय शत्रु होता म्हणून इतिहास पुसला जाणार का? आणि औरंगजेब चा इतिहास पुसला तर छत्रपती शिवाजी महाराज कसे सांगणार? मनीपुर जळताना, मनोहर कुळकर्णी राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, महात्मा फुले यांच्या वर चुकीचे विधान करताना औरंगजेबाचा आधार घेऊन विषय का वळवला जातो? मान्य केले औरंगजेब हा शिवरायांचा शत्रु होता म्हणून तो वाईटच, पण मनिपुर जळताना, महिलेची नग्न धिंड काढताना छत्रपती शिवाजी महाराज यांनी काय केले असते, नराधमांना कोणती शिक्षा दिली असती यावरही बोला ना. औरंगजेब चुकिचा होता यावर चर्चा केल्या पेक्षा छत्रपती शिवरांयाच्या कार्यावर का बोलले जात नाही. बर शत्रु नेमके माणायचे कोणाला हा मुळ प्रश्न गुलामांना कधीच पडत नाही. एखाद्या चे विचार आचार वाईट आहेत म्हणून गुलाम कधीच त्याला विरोध करत नाहीत. गुलामांचा विरोध आहे तो धार्मिक द्वेषाला. औरंगजेब याचा तिरस्कार हा औरंगजेब छत्रपती शिवरायांचा शत्रु होता म्हणून केला जात नाही तर औरंगजेब केवळ मुस्लिम होता म्हणून केला जातो हे अनेक उदाहरणामधुन दिसुन येतो. जर छत्रपती शिवाजी महाराज यांचे शत्रु हेच स्वराजाचे खरे शत्रु माणले तर कृष्णा भास्कर कुलकर्णी ला अजूनही कोणी शिवाजी महाराज यांचे शत्रु म्हणून बोलले नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांना विरोध करणारे अनेक हिंदु धर्मातीलच होते त्यांना ही कधी शत्रु म्हणून बोलले नाही. म्हणजे औरंगजेब याचा तिरस्कार करण्याची नेमके मुद्दे कोणते. आणि ज्या मुद्यावर औरंगजेब याला शत्रु माणले जाते तेच मुद्दे इतरांना लागु होतात का? जर तेच मुद्दे इतरांना लागु होत नसतील तर आणि औरंगजेब ला केवळ मुसलमान म्हणून टार्गेट केले जात असेल तर हा छत्रपती शिवरायांचा अवमान नाही का? नेहमी नेहमी स्वराज्याचा शत्रु असलेल्या औरंगजेबवर चर्चा केल्या पेक्षा छत्रपती शिवरायांवर चर्चा का होत नाही? असे प्रश्न असले तरीही गुलामांना मात्र एकही प्रश्न पडत नाही. अलीकडे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे यांनी औरंगजेब याच्या बद्दल एक वक्तव्य करून औरंगजेब याने सतीची प्रथा बंद केल्याचा उल्लेख केला. एवढ्या मोठ्या अभ्यासकाने उल्लेख केला म्हणजे कुठे तरी आधार असेल च. परंतु काही गुलामांनी सतीची प्रथा औरंगजेब याने बंद केली च नाही असे सांगुन नेमाडे यांना लक्ष करून औरंगजेब याला क्रुर ठरवले जात आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या सतीच्या वक्तव्यावरून गुलामांनी जी प्रतिक्रिया द्यायला सुरुवात केली त्यावरून असे दिसते कि सतीची प्रथा खरचं समाजाला कलंक होती. महीलांवर अन्याय करणारी होती. मग जर सतीची प्रथा घातक होती, ती औरंगजेब याने बंद केली नाही हे दोन्ही विधान जर सत्य मानले तर सतीची प्रथा सुरू करणारे आणि प्रथा बंद होऊच नये म्हणुन प्रयत्न करणाऱ्यांना तर महिलांचे शत्रु म्हणायला पाहिजे. सती प्रथेवरून महिला प्रेम व औरंगजेब द्वेष दाखवणारे गुलाम महिलांना गुलाम कोणी बनवले? त्यांचे शिक्षण, हक्क अधिकार कोणी नाकारले? महिला शिक्षणाला विरोध कोणी केला? महिलांबद्दल अवमानकारक लिखाण कोणी केले यावर कधी बोलतील का? औरंगजेब हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा शत्रु होता म्हणून त्याचा तिरस्कार करणारे गुलाम ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी शोधुन काढली व गौरव करण्यासाठी पोवाडा लिहला त्या महात्मा फुलेंचा स्विकार करतात का? महात्मा फुले यांनी समाधी शोधून काढून जेव्हा शिवरायांच्या समाधीला फुलं अर्पण करून वंदन करत होते तेव्हा समाधीवरील फुलं बाजूला सारणाऱ्याला अजून शत्रु संबोधून त्याचा तिरस्कार केला गेला नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन औरंगजेब केवळ मुस्लिम होता म्हणून त्याचा तिरस्कार करणे हाच सर्वात मोठा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराचा अवमान आहे. छत्रपती शिवरायांची शिकवण आम्हाला कधी कळालीच नाही. शत्रु ची कबर बांधणारे आमचे महान मानवतावादी छत्रपती शिवाजी महाराज होते. परंतु कबरी वरून वातावरण दुषीत करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे मावळे होऊच शकत नाहीत. अठरा पगड जातीतील लोकांना एकत्र करून मावळा ओळख निर्माण करून जातीधर्मा मध्ये बंधुभाव निर्माण करून आदर्श समाजव्यवस्था निर्माण केली. परंतु आज त्याच छत्रपती शिवरायांच्या राज्यात छत्रपतीच्याच नावाचा वापर करून सामाजिक द्वेष पेरला जातो कारण आजही छत्रपती शिवाजी महाराज आम्हाला कळाले नाही. मेंदु, आणि शिक्षणाचा योग्य वापर न केल्यामुळे आजही माणसिक गुलाम झाले आहेत. आणि हि गुलामी एवढी खोलवर जात आहे लोकांना खरे काय खोट काय. आपला कोणी वापर तर करून घेत नाही ना. धर्माच्या नावाखाली राजकीय नेते छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार बाजूला सारून स्वतः चेच विचार तर पेरत नाही ना याचेही भान राहीले नाही. केवळ गुलाम आज मालकाला सलाम करून कोणतेही कृत्य करायला तयार होतात आणि स्वतः चे आयुष्य अंधकार मय करतात. मालक मात्र धर्माच्या नावाखाली गुलामांना भावनिक बनवून त्यांच्या वापर केवळ आणि केवळ राजकीय सत्तेची पोळी भाजण्यासाठी करत आहेत. कोणाला असे वाटत असेल राजकीय नेते धर्माचे काम करत आहेत तर अस समजून जावे तुमचाही रस्ता गुलामीकडेच आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

### मणिपूरमध्ये लवकरच शांतीचा

मिझोरमवर हल्ला केला होता. ईशान्य भारताचा नेहरू विकास करत नाहीत असा आरोप राममनोहर लोहिया यांनी केला. मणिपूरच्या शाळांमध्ये एकेकाळी राष्ट्रविरोधी शिक्षण दिलं जायचं त्यावेळी त्याठिकाणी काँग्रेसचे सरकार असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. ईशान्य भारतातील समस्यांची जननी काँग्रेस असल्याचा आरोपही त्यांनी केला. ईशान्य भारत हा आमच्या काळजाचा तुकडा असून त्याचा विकास हेच आमचं ध्येय असल्याचं नरेंद्र मोदी म्हणाले.

### मणिपूर हिंसाचाराच्या चौकशीबाबत

काढल्याच्या प्रकरणाचाही तपास सीबीआयकडूनच केला जाणार आहे. लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी राज्याबाहेरील अधिकाऱ्यांनाही तपासात सहभागी करून घेतले जाईल, असे न्यायालयाने म्हटले आहे. एसआयटीमध्ये किमान एक पोलीस निरीक्षक असावा, हा पोलीस निरीक्षक इतर राज्यातील असावा. इतर राज्यातून पोलीस महासंचालक दर्जाचे ६ अधिकारी असावेत, जे ४२ एसआयटीच्या कामावर देखरेख करतील. हे अधिकारी राजस्थान, मध्य प्रदेश, ओडिशा, झारखंड आणि दिल्ली या राज्यातील असणार आहेत.

सुनावणीदरम्यान राज्य सरकारने विविध प्रकारच्या गुन्ह्यांच्या तपासासाठी एकूण ४२ विशेष तपास पथके (एसआयटी) तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. याला मान्यता देताना न्यायालयाने म्हटले आहे की, केंद्र सरकारने एसआयटीमध्ये राजस्थान, मध्य प्रदेश, ओडिशा, झारखंड आणि दिल्ली येथून १-१ निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. तसेच, मणिपूरच्या बाहेरील किमान १४ एसपी दर्जाचे अधिकारी पाठवावे.. हे अधिकारी एसआयटीचा कार्यभार सांभाळतील. दत्ता पडसलगीकर एसआयटीच्या तपासावर देखरेख करणार आहेत.

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक

महाडीबीटी प्रणालीवरुन शिष्यवृत्ती, शिक्षण फी परीक्षा फी पोर्टलव्दारे महाविद्यालयास दिली जाईल. त्यामुळे प्रवेशावेळी संबंधित विद्यापीठ/शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये/तंत्रनिकेतने यांनी कोणत्याही मागासवर्गीय विद्यार्थ्याकडून शैक्षणिक प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम घेऊ नये. तसेच कोणत्याही मागासवर्गीय विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही, याची योग्य दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थेची राहील. या सूचनेचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास संबंधितावर प्रचलित नियमानुसार प्रशासकीय वा शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. याची सोलापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी, असे निर्देश श्री. चौगुले यांनी दिले आहेत.

### मारुती व्हॅनच्या अपघातात चार ठार..

सिद्धेश्वर कुरोली येथील पांडूरंग देशमुख यांच्या मारुती व्हॅनतून सिद्धेश्वर कुरोली, बनपुरी व दहिवडी येथील दहाजण सांगलीपलीः जिल्ह्यातील लोकरेवाडीला देवदर्शनासाठी निघाले होते. कातरखटाव ते मायणी दरम्यान, असलेल्या सूर्याचीवाडी गावाच्या हद्दीत चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने मारुती ओमनी व्हॅन (एमएच ११, बीव्ही ७२४६) ही रस्त्याकडील झाडावर जाऊन जोराने धडकल्याने हा भीषण अपघात झाला. त्यातील जखमींवर वडूज व सातारा येथे उपचार सुरु आहेत. अपघाताची नोंद वडूज पोलीस ठाण्यात झाली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल माने हे करीत आहेत.

### सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत महिला..

वार्षिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे, असे सांगितले.

सर्व शाळांमध्ये समिती स्थापन करण्याचे शिक्षणाधिकाऱ्यांना त्यांनी सांगितले. तसेच कामगार विभागांनी अंतर्गत येत असलेल्या आस्थापनामध्ये समिती स्थापन करुन अहवाल सादर करावा. मोठ्या आस्थापनेमध्ये वर्षातून एकदा या अधिनियमाबाबत कार्यशाळा आयोजित करावी, असे त्या म्हणाल्या.

या समितीच्या अध्यक्षाचा कार्यकाळ तीन वर्षाचा राहणार असून त्यांची इतरत्र बदली झाल्यास पुनर्गठन करण्यात येईल. १० कर्मचारी किंवा जास्त असेल तिथे ही समिती गठीत करावयाची असून १० पेक्षा कमी कर्मचारी असणारे कार्यालय जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार निवारण समितीच्या अंतर्गत येतील, असे भारती मानकर यांनी सांगितले. यावेळी सर्व आस्थापनांच्या समितीचा आढावा घेण्यात आला.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने प्रा. हरी नरके यांना भावपूर्ण श्रद्धांजली..



उस्मानाबाद/प्रतिनिधी ३ महाराष्ट्रातील थोर साहित्यिक विचारवंत परिवर्तनाच्या चळवळीतील शिलेदार, अभ्यासू, वक्ते ओबीसी समाजाच्या हक्कासाठी विरक्त झुंज देणारे लढवय्या व्यक्तिमत्व महात्मा फुले यांच्या विचारांची ओळख करून देत संशोधन करून क्रांतीसुर्य महात्मा फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र लेखक प्रा. हरी नरके यांचे अकाली निधन झाल्याचे समजताच बहुजन वर्गात दुःखाची लाट पसरली आहे. ओबीसी सह बहुजन समाज प्रा. हरी नरके यांच्या विचाराला परका झाला आहे. त्यांच्याप्रती संवेदना प्रकट करण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने कळंब शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यानात शोकसभेचे आयोजन जिल्हाध्यक्ष संतोष भोजने, सचिन डोरले, यांनी केले. यास शहरातील विविध मान्यवर व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक सी.आर घाडगे, प्रा. अरविंद खांडके,डी. टी वाघमारे, ज्येष्ठ साहित्यिक के.व्हि सरवदे,प्रकाश भडंगे, बंडू आबा ताटे, ह. भ. प महादेव महाराज अडसूळ, समता परिषद तालुकाध्यक्ष प्रा. राजेंद्र खडबडे, सा. साक्षी पावन ज्योत चे उपसंपादक माधव सिंग राजपूत, ज्येष्ठ मार्गदर्शक टी.जी माळी, विशाल वाघमारे, सचिन डोरले तालुकाध्यक्ष अशोक शिंपले, भारत शिंदे, अरुण माळी, गणपत तपिसे, निलेश पांचाळ, मुकेश वाघमारे, चिंचकर, रामदास गोसावी, रसूल खान, विनोद रणदिवे, राजाभाऊ ईटकर, अरबाज पठाण, यशवंत हौसलमल,सी. टी तांबडे,राजाभाऊ वाघमारे, इत्यादी उपस्थित होते.

# काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी लोकसभेतून निलंबित, पंतप्रधानांबद्दलचं 'ते' वक्तव्य भोवलं

नवी दिल्लीः संसदीय कामकाजात व्यत्यय आणल्याच्या आणि देशाची बदनामी केल्याच्या आरोपाखाली काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांना लोकसभेतून निलंबित करण्यात आलं आहे. विशेषाधिकार समिती त्यांच्या विरोधात अहवाल सादर करेपर्यंत अधीर रंजन चौधरी यांना लोकसभेतून निलंबित करण्यात आलं आहे. हे प्रकरण आता विशेषाधिकार समितीकडे सोपवण्यात आलं आहे. विशेषाधिकार समिती याप्रकरणी निर्णय घेईपर्यंत चौधरी निलंबित असतील. भाजप नेते आणि संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी अधीर रंजन यांच्या निलंबनाचा प्रस्ताव सभागृहात मांडला होता, जो संसदेत मान्य करण्यात आला.प्रल्हाद जोशी यांनी अधीर रंजन चौधरी यांच्यावर संसदीय कामकाजात सतत व्यत्यय आणल्याचा आणि देशाची बदनामी केल्याचा आरोप केला होता. सभापतींनी अनेकदा इशारा देऊनही चौधरी यांचं वागणं बदललं नाही असंही जोशी यांनी म्हटलं आहे. तसेच याप्रकरणी त्यांनी माफीदेखील मागितली नसल्याचं जोशी यांनी म्हटलं आहे.ज्या वक्तव्यामुळे अधीर रंजन चौधरी यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली, तेच वक्तव्य कावाईनंतर चौधरी यांनी पुन्हा केलं. तसेच चौधरी म्हणाले, पंतप्रधानांचा अनादर करणं हा माझा उद्देश नव्हता. मी केवळ धृतराष्ट्र आणि द्रौपदीचं उदाहरण दिलं होतं. भाजपाचा एक धिप्पाड खासदार माझ्यावर हल्ला करण्यासाठी आला तेव्हा मी कुठलीही तक्रार केली नव्हती. ते सध्या बहुमताचं राजकारण करत आहेत. मी कुठलाही चुकीचा शब्द उच्चारला नव्हता. तुम्ही कुठल्याही घटनातज्ज्ञाला जाऊन विचारा.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## पत्रकार कल्याण निधी समितीचे सदस्य राजा माने यांचा माहिती कार्यालयाच्या वतीने सत्कार



सोलापूर/प्रतिनिधीः राज्य शासनाच्या शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी समितीवर सोलापूर जिल्ह्याचे जेष्ठ पत्रकार राजा माने यांची सदस्य पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्यानिमित्त माहिती कार्यालयात जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी श्री. माने यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी वरिष्ठ पत्रकार प्रशांत माने, राजाराम मस्के उपस्थित होते.राज्य शासनाकडून शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी समितीवर नुकतीच ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पत्रकारांच्या आरोग्य व उपचार विषयक समस्या, आकस्मिक संकटे या सारख्या विषयांसाठी राज्य शासनाने आर्थिक तरतूद करुन शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी समितीची स्थापना केलेली आहे.

## काशिराया काका पाटील विद्यालयच्या वतीने भारतीय सैन्यात निवड झाल्याबद्दल श्रीमंत बनसोडे यांचा सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधीः दि.१० अक्कलकोट येथे काशिराया काका पाटील विद्यालय च्या वतीने भारतीय सैन्यात निवड झाल्याबद्दल संस्थेचे सचिव मा. श्री मल्लिकार्जुन पाटील यांच्या हस्ते श्रीमंत बनसोडे व परिवाराचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे श्री मल्लिकार्जुन पाटील आणि फकीरा दल जिल्हाप्रमुख व सामाजिक कार्यकर्ते ज्योतिबा पारखे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाप्रसंगी एनसीसीच्या व इतर विद्यार्थ्यांच्या वतीने पुष्पाची उधळण करत बँडच्या मदतीने बनसोडे परिवाराचे स्वागत करण्यात आले

शाल व श्रीफळ देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी अश्विनी पाटील,ज्योती स्वामी, सदलापूरचे सरपंच बसवराज बनसोडे, शीला अमोगी, मोहन पाटील दत्तात्रेय कवठे,काशिनाथ कापसे जगदेवप्पा बमगोंडे आधी शिक्षक कर्मचारीवृंद विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वातंत्र्य सैनिकाचे वारसदार संजय सुरवसे यांचे सत्कार



सोलापूर/प्रतिनिधीः ९ऑगष्ट क्रांती दिनानिमित्त हुतात्मा स्मारक, जिजामाता उद्यान शेजारी ,पंढरपूर.येथे राष्ट्रीय नाभिक संघटना सोलापूर जिल्हा, क्रांती मित्र सामाजिक संस्था महाराष्ट्र, यांच्यावतीने नाभिक समाजातील स्वातंत्र सैनिक वारस सन्मान सोहळा २०२३ निमित्त वागदरीचे स्वातंत्र्य सैनिक कैलासवासी श्री परममेश्वर सुरवसे यांचे वारसदार श्री संजय सुरवसे(अक्कलकोट तालुका अध्यक्ष नाभिक टायगर सेना महाराष्ट्र राज्य) यांचे मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पहार व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आले.यावेळी नाभिक समाजातील इतर स्वातंत्र्य सैनिक वारसदाराना सन्मानीत करण्यात आले. यावेळी डॉ. पांडुरंग जगताप, मयुरशेठ, अरूण जाधव, बबन शेटे, पांडुरंग चौधरी सर, कुसुमताई क्षीरसागर, श्रीराम ताटे व ज्ञानेश्वर गायकवाड या मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आले

यावेळी सुधीर भाऊ गाडेकर, मल्लीनाथ चौधरी सर आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन किरण भांगे, तुकाराम चव्हाण, जितेंद्र भोसले आणि सहकारी अतिशय सुंदर उत्कृष्ट कार्यक्रम आयोजित केले यावेळी पंढरपूर शहर आणि तालुक्यातील तसेच सोलापूर जिल्ह्यातील नाभिक समाज बांधव उपस्थित होते.

## शिवसेना विधानसभा व लोकसभा संपर्कप्रमुख महेश नाना साठी यांच्या प्रयत्नाला यश



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यातील कोर्टी या गावाला एम आर जी एस या योजनेअंतर्गत १५ लाख रुपये निधी संदिपान भुमरे यांना पत्र देऊन कोठे गावच्या विकासासाठी पंधरा लाख रुपये देण्यात आले आहे शिवसेना विधानसभा लोकसभा संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून हा निधी मंजूर पंधरा लाखांमध्ये कोर्टीगाव अंतर्गत फेवर ब्लॉक पेमेंट रस्ता करण्यासाठी हा निधी कोर्टी गावच्या विकासासाठी आणला आहे फ्लेवर ब्लॉक व सिमेंट कॉंक्रीट रस्ता उत्तम प्रतीचा करून कोरडे गावच्या विकासासाठी अधिक निधी मंजूर करून आणू असे आश्वासन महेश शेडगे कोरडे गावच्या विकासासाठी निधी उपलब्ध झाल्यानंतर कोर्टी गावच्या नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे

## दूरशिक्षणच्या वतीने सांगलीत प्रवेश प्रक्रिया शिबीराचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्गत शैक्षणिक वर्ष २०२३ २४ साठी बी.ए.बी.कॉम.एम.ए.(मराठी,हिंदी, इंग्रजी,अर्थशास्त्र,राज्यशास्त्र,समाजशास्त्र व इतिहास) एम.कॉम.,एम.एस्सी.,(गणित)अशा विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी सांगली येथील श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज येथे शुक्रवार दिनांक ११/०८/ २०२३ रोजी प्रवेश प्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी ज्या विद्यार्थी, गृहिणी, कामगार, उद्योजक व शेतकरी यांना प्रवेश घ्यावयाचा आहे,अशांनी सहा. प्रा.डॉ.नितीन रणदिवे (मो.७८४३०३०४८५) सहा.प्रा.डॉ.सुशांत माने (मो.९५८८४१८५९५) यांच्याशी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा,असे आवाहन संचालक डॉ.मोरे यांनी केले आहे.

# मुंबई मॅरेथॉन सर्वसमावेशक स्पर्धा : राज्यपाल रमेश बैस

## टाटा मुंबई मॅरेथॉन स्पर्धेच्या नावनोंदणी प्रक्रियेचा शुभारंभ




मुंबई : मुंबई मॅरेथॉन ही श्रीमंत - गरीब, शहरी - ग्रामीण, युवा - वृद्ध, स्त्री - पुरुष यांसारखे भेद मिटवणारी सर्वसमावेशक स्पर्धा आहे. ही मॅरेथॉन स्पर्धा लोकशाही व धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांचा पुरस्कार करते. प्रत्येक गाव, शहर व महानगराची स्वतःची मॅरेथॉन सुरु झाल्यास त्यातून क्रीडा संस्कृतीला चालना मिळेल व एकात्मता बळकट होईल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले. दिनांक २१ जानेवारी २०२४ रोजी होणाऱ्या टाटा मुंबई मॅरेथॉन स्पर्धेच्या नावनोंदणी प्रक्रियेचा शुभारंभ राज्यपाल श्री. बैस यांच्या स्वतःच्या नावनोंदणीने करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार आशिष शेलार, मॅरॅथॉनचे आयोजक अनिल सिंह व विवेक सिंह, माजी क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मुंबई मॅरेथॉनना परोपकारी समाजकार्याची जोड दिल्याबद्दल राज्यपालांनी आयोजकांचे अभिनंदन केले. मॅरेथॉनच्या माध्यमातून गेल्या १९ वर्षांमध्ये ७०० अशासकीय सेवाभावी संस्थांनी सामाजिक उपक्रमांसाठी ३५६ कोटी रुपयांचा निधी उभा केला, त्यामुळे देशाच्या सुदूर क्षेत्रातील दिव्यांग व इतर वंचित लोकांना लाभ झाला, असे राज्यपालांनी सांगितले.आज देशात जीवनशैली संबंधी मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग सारख्या समस्या वाढत आहेत. हे आजार टाळण्यासाठी नियमित चालणे, धावणे व व्यायाम करणे यासारखा स्वस्त उपाय दुसरा नाही असे सांगून मॅरेथॉन मध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयीन युवकांना प्रोत्साहित केले पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

आपण मुंबई मॅरेथॉनशी स्थापनेपासून जोडलो असल्याचे सांगून आज ही स्पर्धा जगातील पहिल्या दहा मॅरेथॉन पैकी एक झाली याबद्दल अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आयोजकांचे अभिनंदन केले

. अबाल वृद्धांपासून सर्वजण सहभागी होत असलेली मुंबई मॅरेथॉन ही मुंबईचा सण झाली आहे, असे भुजबळ यांनी सांगितले.टाटा मुंबई मॅरेथॉन समाज कार्यात देखील योगदान देत असल्यामुळे त्या माध्यमातून देशसेवा घडत आहे, असे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी मुंबई, गोवा व गुजरात विभागाचे मेजर जनरल एच.एस. कहलों, नौदलाच्या महाराष्ट्र विभागाचे ध्वज अधिकारी रिअर ॲडमिरल ए एन प्रमोद, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक नरेश लालवानी,

पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक अशोक मिश्रा, मॅरॅथॉनचे आयोजक अनिल सिंह व विवेक सिंह, अभिनेते राहुल बोस, टाटा समूहाचे ब्रँड कस्टोडियन हरीश भट्ट, टीसीएसचे उज्वल माथूर, आयडीएफसी फर्स्ट बँकेचे मुख्य अधिकारी एम बालकृष्णन, माजी क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.



## अक्कलकोट आसताने सय्यद दातापीर शहा कादरी रह. दर्गाहचा ७८व्या उरुसाला उत्साहात सुरूवात

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर-अक्कलकोट रोड आसताने येथील प्रसिद्ध असलेले सय्यद दातापीर शहा कादरी रह. यांचा दर्गा आहे.. ७८ वर्षापासून या ठिकाणी उरुस भरण्याची परंपरा आहे. काल पासून या उरुसाला सुरुवात झाली असून रात्री संदलचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस चालणाऱ्या या उरुसात महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक अशा विविध राज्यातील सर्वधर्मातील भाविक येत असतात. हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या दर्ग्यावर संदल दिवशी चादर चढविण्यासाठी मोठ्याप्रमाणात दाखल झाले होते. उरुस निमित्त मोठी यात्रा देखील या ठिकाणी भरते. आणखी दोन दिवस चालणाऱ्या या यात्रेत हजरत सय्यद मीर आलम नवाज शाह कादरी कलाम (भजन) दाता बळोरगी ग्रुप,अक्कलकोट चा आयोजन केला आहे. आणि ज्यारात दिवशी रात्री आजीमून शान जलसा सय्यद रिजवान पाशा कादरी (हेद्राबाद) व मैफिले नुरी नात प्रोग्राम हिंदुस्तानचे मसूर हाफिज (कारी) सय्यद फुरकान अली नकश बंदी साहेब किबला (हैद्राबाद) देखील आयोजन करण्यात आले आहे.

## स्वेरीमध्ये कृषी महाविद्यालय,पुणेचे सातवे स्नेहसंमेलन थाटात संपन्न




पंढरपूर/प्रतिनिधीः कृषी महाविद्यालय,पुणे येथील १९७३ ते ७७ दरम्यान असणाऱ्या कृषी पदवीधरांचे सातवे स्नेहसंमेलन गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये मोठ्या उत्साहात पार पडले. या 'गेट-टुगेदर' मध्ये निवृत्त बँक अधिकारी पासून ते पोलीस उपअधीक्षक, आयुक्त पर्यंतचे अनेक अधिकारी आपले अधिकारी पद विसरून तन, मन, धनाने मित्र बनून स्वेरी कॅम्पसमध्ये एकरूप झाले होते.

सोलापूर जिल्हा कृषी वर्गमित्र १९७३ ते ७७ मधील वर्ग मित्रांनी या उपक्रमाचे उत्तम नियोजन केले होते. प्रारंभी भजन गीतांच्या मैफिलीने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी कृषी महाविद्यालय पुण्यातील १९७३ ते ७७ बॅच मधील पदवीधरांचे स्वागत केले. पांडुरंग कोडग यांनी प्रास्ताविकामध्ये या सातव्या स्नेहसंमेलनाच्या आयोजनाबद्दल सविस्तर माहिती दिली.

दुपारच्या सत्रात हास्यसम्राट दीपक देशपांडे यांनी उडविलेल्या हास्याच्या फवारणीने सर्वजण चिंब भिजले. 'मैत्रीचे नाते हे रक्ताचे नसले तरी आत्मीयतेने जोपासले जाते' याचाच प्रत्यय या कृषी पदवीधरांच्या स्नेह संमेलनातून दिसून येत होता. माजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सांगलीचे डॉ.विश्वासराव मोरे यांनी स्वेरीच्या यशस्वी वाटचालीची सविस्तर माहिती देवून आपल्या निर्भेळ वकृत्वाने संमेलनाला उर्जा दिली. मिष्ठांन्न भोजनानंतर एकमेकांचा परिचय, हितगुज, चर्चा, धमाल मनोरंजन, जेष्ठांचा सत्कार, यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वेरीमध्ये एकूणच दिवसभर उत्साहाचे वातावरण होते.


यावेळी स्वेरीच्या विश्वस्त व गुरसाळे येथील श्री.विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षा सौ. प्रेमलता रोंगे, स्वेरीचे युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, यांच्यासह कृषी महाविद्यालय पुण्यातील १९७३ ते ७७ बॅच मधील जवळपास १५० वर्ग मित्र सपत्नीक उपस्थित होते. गेट टुगेदर मुळे संपूर्ण कॅम्पस गाड्यांनी व सेवा निवृत्त अधीक्षक, निवृत्त पोलीस अधिकारी, कृषी अधिकारी यांनीच भरला होता. उपस्थितांना संयोजकांच्या वतीने आकर्षक स्मृतीचिन्ह देण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. सविता दुधभाते यांनी केले तर हणमंतराव भोसले यांनी आभार मानले. उमरसिंह परदेशी, माणिकराव साठे, मोहन रेळेकर, खतीब, ज्ञानेश्वर गायकवाड, नंदकिशोर पुंड, यशवंत सुर्वे, शंकर सुर्वे, हरिदास सुर्वे, यशोधन पाटील, विश्रेक्ष पाटील, आदी निवृत्त अधिकारी यावेळी उपस्थित होते.



## लोकधारा ट्रस्टच्या वतीने जागतिक आदिवासी दिन साजरा.

भिवंडी/प्रतिनिधीः शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना आदिवासी संस्कृती बद्दल माहिती व्हावी . समाजासाठी ज्या क्रांतिवीरांनी जो लढा दिला त्या इतिहासाची उजलण व्हावी त्यांची गौरवगाथा माहिती व्हावी विद्यार्थ्यांचे प्रबोधन व्हावे म्हणून दिनांक १० ऑगस्ट २०२३ रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद समतानगर मराठी शाळेत ''लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी आदिवासी संस्कृती बद्दल विद्यार्थ्यांना माहिती देत आदिवासी जीवनावर, संस्कृतीवर कविता सादर करीत विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.

लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने मिलिंद जाधव यांच्या हस्ते विविध पुस्तके शाळेला भेट म्हणून देण्यात आली. तर विद्यार्थ्यांनी चित्रकलेतून वारली पेंटिंग साकारली होती. यावेळी मुखाध्यापिका मिना शेंडे व सहशिक्षक भावना घरात तर विद्यार्थी उपस्थित होते.



## करजगी-शावळ रोडवरील अज्ञात शेतकऱ्यांने केली झाडांची कत्तल..!

दुधनी/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील करजगी-शावळ रस्त्याच्या बाजूला (दुतर्फा)सामाजिक वनीकरण वतीने तीनचार वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्च करुन रोपांची लागवड करण्यात आली होती. ऐन ती झाडे हिरवाईने बहरत व डुलत असताना ते पंधरा ते वीस झाडे तोडण्यात आल्याचे दिसत आहेत.करजगी येथील एका शेतकऱ्याचे त्या रोडच्या लगतच शेती आहे. तो शेतकरी पूर्ण पणे अतिक्रमण करुन त्या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला लावण्यात आलेल्या झाडे तोडून व तसेच खोदण्यात आलेल्या खड्डे बुजवून शेतीसाठी जागा करण्यात आल्याचे चित्र दिसत आहे.तोडलेल्या झाडांचे फांदी व लाकडे आपल्या वस्तीवर आणून टाकल्याचे दिसत आहे.

संबंधित शेतकऱ्यांकडून तोडण्यात आलेल्या झाडे व रोडपर्यंत अतिक्रमण केल्याने संबंधित विभागाने चौकशी करुन त्या शेतकऱ्यांवर कारवाई करण्यात यावे म्हणून अशी मागणी पर्यावरण प्रेमी व नागरिकांमधून होत आहे.

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडून आचेगाव साठी आणखी भरघोस निधी : बलवान गोतसुर्वे



आचेगांव/प्रतिनिधी :आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यामार्फत आचेगांव ता. दक्षिण सोलापूर येथे विविध योजनेअंतर्गत कोट्यावधीचे कामे झाले असून या पुढेही भारतीय जनता पार्टी व सरपंच विश्रांती पाटील यांच्या नेतृवाखाली आमदार सचिन कल्याणशेट्टी आचेगांव ला कधीही निधी कमी पडू देणार नाहीत अशी ग्वाही भाजप अनु जाती तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे यांनी व्यक्त केले .

आचेगांव ता. दक्षिण सोलापूर येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून वार्ड क्र. एक मध्ये ग्रामपंचायत सदस्य गौतमी बलवान गोतसुर्वे व श्रीम मंगल सिद्राम गोतसुर्वे यांच्या प्रयत्नातून चर्मकार समाज स्मशानकंपाउंड व मागासवर्गीय वस्ती मध्ये पेव्हर ब्लॉक व सिमेंट काँक्रिटीकरण करणे या कामाचे भूमिपूजन सरपंच विश्रांती पाटील व ग्रामपंचायत सदस्य मंगल गोतसुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी निवृत्त ऐ एस आय जगन्नाथ गोतसुर्वे, रिपाई नेते विकास गोतसुर्वे,उपसरपंच रफिक मुल्ला, आय वाय कांबळे,महिबूब पाटील,पोलीस पाटील प्यारन मुल्ला, ताजोद्दीन बिराजदार,नागप्पा कांबळे, सुरेश मोची आदी उपस्थित होते. प्रास्ताविक आय वाय कांबळे सर यांनी केले. पुढे बोलताना गोतसुर्वे यांनी आ. कल्याणशेट्टी यांनी गेल्या पंचवार्षिक मध्ये आचेगांव ते इंगळगी रस्ता, गावाला कायमस्वरूपी पाणीपुरवठा साठी जलजीवन मिशन व इतर योजने अंतर्गत पाच ते सहा कोटी चे कामे झाले असून आचेगांव ते हंजगी रस्ता ही मार्गी लागला आहे आणि यापुढेही निधीची कोणतीही कमतरता पढणार नसल्याचे सांगितले. यावेळी सुभाष कांबळे,कपिल गोतसुर्वे, प्रदीप गोतसुर्वे, तुकाराम लाकडे, गेनसिद्ध लाकडे या सह ग्रामपंचायत सदस्य, समाजबांधव, गावकरी उपस्थित होते.

## नळदुर्ग येथे बुद्धनगर भागात निकृष्ट दर्जाचा सिमेंट काँक्रीट रस्ता बनवणाऱ्या ठेकेदारावर ट्रॉसिटीची कारवाई करावी जनतेची मागणी

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत सिमेंट रस्ता

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडेः नळदुर्ग शहराच्या विकास आराखड्यात शहरातील दलित वस्तीमध्ये बुद्धनगर भागात शासकीय गोडाऊनच्या समोरील बाजू लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत नळदुर्ग शहरातील विकास कामांना गती देण्यासाठी व या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा उभी केली जाते कारण नळदुर्ग शहरात गतवर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत झालेल्या जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग ते शासकीय गोडाऊन समोरील अक्कलकोट रस्ता नजीक या काम अंदाजे किंमत ५२ लाख रुपये एवढी असताना दिनांक २ नोव्हेंबर २०२२ रोजी रात्रीच्या वेळी ८ : ३० च्या दरम्यान रात पाळीने ठेकेदार काम करत असल्याचे उघडकीस आल्याने सदरील काम तात्काळ तेथील पत्रकार दादासाहेब बनसोडे आणि काही सुजाण नागरिक गेले असता रात्रीच्या वेळी काम करताय विचारणा केली असता आम्ही काँक्रीट अंतरून घेतोय

आसे म्हणत ते सदरील काँक्रेट रस्ता तात्काळ बंद करण्यात आला याचा पुरावा सुद्धा आहे .

परंतु हा रस्ता शासकीय स्तरावरील नगर परिषदेच्या अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत अंदाजे किम्मत ५२ लाख रुपये चुराडा केले आहेत .

हा रस्ता दलित वस्तीचा असताना हा दलित वस्तीत काम चालू आहे हे माहीत असताना सुद्धा ठेकेदाराने दलितांचा किंवा तेथील नागरिकांचा कसला ही विचार न करता निकृष्ट दर्जाचं कामाची मालीका चालूच ठेवली परंतु निकृष्ट दर्जेच्या कामावर रात्री ८:३० च्या सुमारास एकही अधिकारी दिसलेला नाही किंवा त्या अधिकाऱ्याना माहीती नाही आसे झाले नाही , दलित वस्तीतील जनता

रोज कबाड कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असते दिवसभर कवाड कष्ट करून आलेल्या मजुराला रात्रीची झोप कधी लागेल हे माहिती होत नाही त्या भोळ्या नागरीकांचा फायदा घेत नगर पालिकेच्या ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम करण्याचा मज्जाव केला आहे अशा गुत्तेदारावर ट्रॉसिटी क्टनुसार कारवाई का करण्यात येऊ नये अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे .

तात्काळ नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांना दूरध्वनीवरून विचारणा केली असता सदरील ठेकेदारास त्या ठिकाणी पाठवून देऊन ते काम तात्काळ बंद करण्यात आले एवढे असताना नळदुर्ग शहरातील नगरपालिकेच्या शासकीय कर्मचाऱ्यांनी या कामाकडे चक्क पाठ फिरवली होती मग नळदुर्ग शहराचा विकास कसा होणार विकास गतीमान करण्यासाठी नागरीकानी पुढाकार घेतला पाहिजे . मग शहराचा विकास करू म्हणणारे सुजान नागरिक किंवा लोकप्रतिनिधी याना आसे कामे होत आसताना झोपी लागल्या होत्या का ? जाणून बुजून या कामाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे .

आजही त्या रस्त्याची खूप मोठी दुरावस्था झाली आहे शासकीय गोडाऊनच्या समोरील भाग अर्धवट ठेवून



ठेकेदार पळून गेला की काय असा संभ्रम जनतेत होत आहे कोणताही अभियंता किंवा कर्मचारी असो याकडे फिरकले सुद्धा नाहीत हे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून संबंधित काही संस्था मात्र हे काम गुणवत्ता धारक असल्याचे पत्र देते या संस्थेने प्रत्यक्ष दर्शी येऊन चौकाशी केली आहे का अशा माथेफिरू ठेकेदार संस्थांवर अनुसूचित जाती प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा नोंद करून अशा गुत्तेदाराचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात यावे .

असे अनेक कामे नळदुर्ग शहरांमध्ये निकृष्ट दर्जाचे झालेले आहेत .

आशा अनेक कामावर कोटावधीचा निधी उधळला जातोय या कोट्याधीश निधीला जबाबदार कोण प्रशासन की जनता परंतू नळदुर्ग शहराच्या विकास आराखड्या मध्ये अनेक कामाला कोट्यावधीचा निधी मंजूर झाला आणी तो खर्च करण्यात आला परंतु नळदुर्ग या ऐतिहासिक शहरांमध्ये दलित वस्तीत बुद्धनगर भागामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी सुधार वस्ती योजनेअंतर्गत शासकीय गोडाऊनच्या समोर अक्कलकोट रोड ते जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग प्रवेशद्वारा पर्यंत सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात आले याची अंदाजे किंमत ५२ लाख एवढी होती या अंदाजे किमती एवढे काम तरी झालेच नाही परंतु याच ठेकेदाराने रात्रीच्या सुमारास काम करून दलित वस्तीतील जनतेची आणि प्रशासनाची चक्क फसवणूक केल्याचे उघड झाले आहे यासाठी दलित वस्तीत काम करणाऱ्या ठेकेदारावर नगरपालिका काय कारवाई करणार याकडे नागरीकांचे लक्ष लागले आहे .

अन्यथा नळदुर्ग शहरातील दलित नागरिक या काँक्रीट रस्त्याच्या विरोधात ठेकेदाराविरुद्ध अनुसूचित जाती प्रतिबंध कायद्याखाली गुन्हा नोंद करण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे एक निवेदन घेऊन जाणार आसल्याचे समजते आहे . दलित जनतेची व प्रशासनाची फसवणूक केल्याच्या संदर्भात प्रशासनाने ठेकेदारा विरुद्धात गुन्हा नोंद करावा अशा प्रकारचे निवेदन त्या देण्यात येणार असल्याचे समजते

## काँग्रेसच्यावतीने रोपळेत सत्कार समारंभ

पंढरपूर/प्रतिनिधी : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथे शनिवार दि.१२ रोजी सकाळी दहा वाजता विविध मान्यवरांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कार्यक्रमाचे आयोजक व काँग्रेसच्या माथाडी कामगार विभागाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष अशोक पाटोळे यांनी दिली.





अशोक पाटोळे

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील हे असणार आहेत. तर या कार्यक्रमासाठी माजी गृहमंत्री रमेश बागवे, माजी आमदार रामहरी रूपनवर, सोलापूर जिल्हा काँग्रेस पक्ष निरीक्षक विजय हत्तुरे, सहकार शिरोमणीचे संचालक दिनकर कदम, ओबीसी विभागाचे सुधीर लांडे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार, पंढरपूर शहराध्यक्ष अमर सुर्यवंशी, पंढरपूर तालुकाध्यक्ष हनुमंत मोरे, महाराष्ट्र प्रवक्ता काका कुलकर्णी, मातंग परीषदेचे ज्ञानदेव खंडागळे ,आण्णसाहेब इनामदार, शेतकरी सेलचे जिल्हाध्यक्ष राहुल पाटील, राजु मस्के, आम आदमी पार्टीचे एम.पाटील, आदिवसी समाज अध्यक्ष पप्पु काळे , मातंग एकता आंदोलनचे सुरेश मस्के, प्रकाश साठे, बाजीराव कांबळे यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील काँग्रेसचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाप्रसंगी गट विकास अधिकारी प्रशांत काळे , सिनेअभिनेता पुष्कर लोणारकर, शाहीर नंदकुमार पाटोळे , कलावंत कोमलताई पाटोळे , सरपंच शशिकला चव्हाण, उपसरपंच हनुमंत कदम, सरपंच नागनाथ देवकते, शिवाजी पवार, जगन्नाथ जाधव, दिलीप कोरके, विनोद पाटोळे , उमेश खंदारे, अंबादास वायदंडे, अनिल पाटोळे , तलाठी दादासाहेब पाटोळे , आण्णा पोकळे , पांडुरंग खिलारे, लहुजी सेनेचे मुकूंद घाडगे, बहुजन ब्रिगेडचे राहूल शिंदे, देवीदस कसबे, जयसिंग मस्के, नंदकुमार चव्हाण, नितीन गायकवाड, नामदेव साळुंखे यांच्यासह डॉक्टर व पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी काँग्रेसचे पदाधिकारी व रोपळे येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव, सत्कार समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. तरी या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे असे अवाहन आयोजक व काँग्रेसच्या माथाडी कामगार विभागाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष अशोक पाटोळे यांनी केले आहे.

## जिल्हा परिषद भरती शुल्क कपात करण्याची रिपाईची मागणी



सोलापूर/प्रतिनिधी :महाराष्ट शासनाच्या ग्रामविकास विभागा मार्फत राज्यातील ३४ जिल्हा परिषद मधील गट क मधील सरळ सेवेची जवळ जवळ १९ ४६० इतके पद भरण्याची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे

या जाहिरातीच्या माध्यमातून परीक्षा शुल्क एका जागेसाठी ओपन प्रवर्ग १०००/तर मागासवर्गीय अर्जदारस ९००/ अशा पद्धतीने शुल्क आकारण्यात आले असून ही परीक्षा फी जास्त असून सुशिक्षित बेरोजगारांना न परवाडणारी आहे एकीकडे शासनाच्या माध्यमातून वेगवेगळया जाहीरात करून जनतेच पुळका असल्याचे दाखवायचे आणी दुसरीकडे भरती मध्ये फि वाढवायची आणी बेरोजगाराच्या गळ्याला फास लावण्याचे काम हे सरकार करीत असून महाविकास आघाडीच्या काळात ड ढ मध्ये भरती प्रक्रियेत ६०० शुल्क होते तर हेच विरोधक किती ओरडत होते आणि या सरकारच्या काळात २१ नोव्हेंबर २०२२ रोजी शासन निर्णय जाहीर करण्यात आला होता की लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट ब क आणि ड संवर्गातील पदाच्या भरती साठी T C S आणी आय बी पीएस अशा दोन कंपनीची निवड जिल्हा परिषद ची भरती प्रकिया राबवणार असून कंपनीच्या दर पत्रकानुसार पाच लाख हुन अधिक विध्यार्थी असल्यास ४९५/ प्रमाणे शुल्क आकरले जाणार आहे

या शिवाय संबंधित प्रशासकीय खर्च भागवण्यासाठी १५% कर अशी वाढ करून शुल्क आकारले जावे असे निश्चित करण्यात आले आहे तरी सुद्धा हे शुल्क ५५० पर्यंत जाते परंतु तो शासन निर्णय सुद्धा या शासन कर्त्यांनी गुंडाळून ठेवला आहे. त्याहून अधिक म्हणजे मागासवर्गीय विध्यार्थी असेल तर जवळ जवळ ५०%पर्यंत सूट असत पण त्या विध्यार्थीचे सुद्धा शुल्क वाढवून शासकीय तिजोरी भरून काढण्याचे काम हे सरकार करीत असून तरुण बेरोजगार विध्यार्थीच्या मजबुरीचा फायदा सरकार घेत असून ताबडतोब ही वाढीव शुल्क कपात करून बेरोजगार तरुणांना न्याय द्यावा अशा अश्याचे निवेदन सोलापूर उप जिल्हा अधिकारी शमा पवार यांना रिपब्लिकन पार्टीऑफ इंडिया व रि पा ई अल्पसंख्यांक विभाग सोलापूरच्या वतीने देण्यात आले

या वेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे, माणिक आठवले, रावसाहेब परीक्षाळे, मारुती सोनवणे , धर्मा माने, सलीम मुल्ला, शिकदर शेख, इम्रान शेख, इब्राहिम शेख, नसरीन शेख ,पूनम मोरे, वंदना शेट्टी इत्यादी पदाधिकारी उपस्तित होते

## स्वामीकृपेने कै.कल्याणराव इंगळे महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल : प्रा.जेऊरे

### कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनचा चौदावा वर्धापन दिन उत्साहात साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या इतिहासातील तत्कालीन व सर्वकालीन धडाडीचे नेतृत्व असलेले चेअरमन कै. कल्याणराव इंगळे यांनी गेल्या १५ वर्षापूर्वी मोठी जिद्द बाळगून तालुक्यातील एकमेव तंत्रनिकेतन महाविद्यालयाची निर्मिती केली.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचा पदभार सांभाळत तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडवून आणण्यास मोलाचे योगदान दिले. या पार्श्वभूमीवर आज आपल्या तालुक्यात श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या माध्यमातून कैलासवासी कल्याणराव इंगळे यांनी उभारलेले तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे नावलौकिक संपूर्ण देशात आहे. त्यांच्या मौलिक मार्गदर्शनाच्या पार्श्वभूमीवर वाटचाल सुरू ठेवून महाविद्यालयाची वाटचाल पंधराव्या वर्षात यशस्वीपणे होत आहे, ही बाब तालुक्यातील नागरिकांसह तंत्र शिक्षण इच्छुक विद्यार्थ्यांनाही मोठे अभिमानास्पद आहे. या महाविद्यालयास तंत्रशिक्षणास इच्छुक तळमळ असलेल्या विद्यार्थ्यांचा मोठा वारसा लाभत आहे. विद्यार्थ्यांची तंत्रशिक्षणाप्रती असलेली जिद्द व महाविद्यालयातील स्वामी सेवाभावातून चालू असलेली व्यावसायिक शिक्षण प्रणाली यांचा संयुक्त संगम साधून श्री स्वामी समर्थांच्या कृपेने कै. कल्याणराव इंगळे महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन कै.कल्याणराव इंगळे महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे यांनी केले. आज येथील कै.कल्याणराव इंगळे महाविद्यालयाचा १४ वा वर्धापन दिन वृक्षारोपण, विद्यार्थी मार्गदर्शन शिबिर, विद्यार्थी मेळावा इत्यादी विविध कार्यक्रमांनी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य नागनाथ जेऊरे बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी देवस्थानचे विद्यमान चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे, प्रथमेश इंगळे, प्रा.नागनाथ जेऊरे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या व कै.कल्याणराव इंगळे यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार घालुन अभिवादन करत आकाशात फुगे सोडून महाविद्यालय वर्धापन दिनाचा आनंद साजरा करण्यात आला. पुढे बोलताना प्राचार्य नागनाथ जेऊरे यांनी आपल्या महाविद्यालयाचे संस्थापक तत्कालीन चेअरमन कै.कल्याणराव इंगळे साहेबांनी देवस्थान व तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्याच विद्यार्थी वसतिगृहातील मुलांना मोफत भोजनाचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल व देवस्थान अन्नदानाच्या माध्यमातून ही सेवा आजही अखंडपणे सुरू असल्याबद्दल साहेबांचे मनपुर्वक आभार मानले. महाविद्यालयाचे संस्थापक तत्कालीन चेअरमन कै.कल्याणराव इंगळे यांच्या कार्यपद्धतीची प्रेरणा घेत देवस्थानचे विद्यमान चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे व विश्वस्त सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली व उच्चस्तरीय शिक्षण प्रणालीच्या अधिपत्याखाली तंत्रनिकेतनची घोडदौड सुरू आहे. याची दखल घेत या महाविद्यालयास एन.बी.ए. मानांकन प्राप्त झालेले आहे. यापुढेही तालुक्यातील तंत्रशिक्षण इच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या श्री स्वामी समर्थांच्या कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात शिक्षण घेऊन आपल्या तालुक्याचा व आपल्या महाविद्यालयाचा व विशेष करून श्री स्वामी समर्थांचे मूळ देवस्थानचा नावलौकिक वाढवावा असेही मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, प्राचार्य एन.बी.जेऊरे सर, उपप्राचार्य विजयकुमार पवार सर, एसीओ अमोल भावठाणकर सर, विभागप्रमुख माने सर, विभागप्रमुख जनगोंडा सर, विभाग प्रमुख खिलारी सर व सर्व टिचींग व नॉन टिचींग स्टाफ व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन घुरघुरे सर यांनी केले तर, कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिराळ मॅडम, पोतदार मॅडम, श्रुती पाटील मॅडम, ममनाबाद मॅडम, जहागिरदार मॅडम, सागर लोणारी सर आदींनी परिश्रम घेतले.

## हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जागतिक आदिवासी दिन साजरा



नवापूर/प्रतिनिधीः आदिवासी संस्कृती टिकवण्यासाठी नवापुर तालुक्यातील कोळदा केंद्रातील प्राथमिक शाळा जुनी सावरट येथे १० ऑगस्ट रोजी २०२३ हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.

शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना आदिवासी संस्कृती बद्दल माहिती व्हावी . दिवस समाजासाठी ज्या क्रांतिवीरांनी जो लढा दिला त्याचा इतिहास, त्यांची गौरवगाथा माहिती व्हावी त्यांचे प्रबोधन व्हावे म्हणून हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.यावेळी हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा दर्शना वसावे यांनी आदिवासी संस्कृती बद्दल विद्यार्थ्यांना माहिती देत आदिवासी जीवनावर,शिक्षणावर कविता सादर करीत विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.यावेळी केंद्रप्रमुख बकाराम एस. गावित, मुख्याध्यापिका सुषमा गावित, सहशिक्षिका रजिता कापडनिस, अमिता वसावे तर विद्यार्थी उपस्थित होते .

## तेजस्वी सातपुते यांच्या वर्दीवर मानाचा तुरा

सोलापूर/प्रतिनिधी : येथील तत्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी त्यांच्या सेवा कालावधीत राबवलेल्या ऑपरेशन परिवर्तनला आणखी एक पुरस्कार जाहीर झाला. त्यामुळे



त्यांच्या वर्दीवर आणखी मानाचा तुरा खोवला गेला आहे. जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारूची निर्मिती व विक्री बंद करण्यासाठी ऑपरेशन परिवर्तन हा उपक्रम सातपुते यांनी हाती घेतला होता. त्यामध्ये त्यांनी हातभट्टी दारू व्यवसाय करणाऱ्या ७३७ लोकांचे परिवर्तन करून त्यांना व्यवसाय सुरू करण्यास मदत केली. त्यांच्या या कामाची केंद्राच्या गृह विभागाने दखल घेतली. ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट, गृह विभाग दिल्ली (बीपीआरएनडी) कडून संरक्षण दलातील नावीन्यपूर्ण कामासाठी सन्मान चिन्ह प्रदान करण्यात येते. यावर्षी सातपुते यांनी जिल्ह्यात ऑपरेशन परिवर्तनमध्ये केलेल्या कामांची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर झाला आहे.